# ❋ मानपत्र ❋

यशस्वी उद्योजक मा.श्री.मधुकर गोखले यांना कुस्त्रो वाडिया इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीची माजी विद्यार्थी संघटना ''CWITIAN '' यांच्या वतीने या वर्षीचा ''DIAMOND OF CWITIAN 2018'' पुरस्कार देताना आम्हांस अभिमान वाटत आहे.

दि. २२ ऑक्टोबर १९४० रोजी पुण्यात आपला जन्म झाला. सन १९५८ मध्ये पुण्यातील फर्ग्युसन कॉलेजमधून इंटर सायन्स हा अभ्यासक्रम पूर्ण करुन आपले करियरच्या दृष्टीने सन १९६० मध्ये आयटीआय, कुस्त्रो वाडिया टेक इन्स्टिट्यूट, पुणे येथे ड्राफ्टस्मन शिपमेंटमध्ये मॅकॅनिकल डिप्लोमा हा अभ्यासक्रम पूर्ण केला. तसेच सन १९६७ मध्ये मॅकॅनिकलमधील डिप्लोमा इंजिनियरिंग हा अभ्यासक्रम एस. व्ही. पॉलिटेक्निक, भोपाळ, मध्यप्रदेश येथून यशस्वीरित्या पूर्ण केला.

सतत नाविन्याचा ध्यास घेतलेलं एक सृजनशील व्यक्तिमत्व. हे नाविन्य दिसतं अगदी आपल्या कंपनीच्या ''मन्मन'' या नावापासून! ''सृजनं शल्यविदे'' हे घोष वाक्य प्रत्यक्षात आणलय आपण आपल्या ''Manman Manufacturing Co. Pvt. Ltd.'' या ''Surgical Equipment '' बनवणा-या उद्योगातून. आकाशाला गवसणी घालण्याचा आपला स्वभाव, त्यामुळे इंजिनियर डिझायनर, निर्माता आणि सर्जिकल इन्स्ट्रुमेंटसचा व्यवसाय आपण केलात.

जागतिक दर्जाची पण वाजवी किमतीत अशी शल्यक्रिया उपकरणे भारतातही बनवता आली पाहिजेत, असा ठाम आत्मविश्वास असलेल्या आपण विकसित केलेली आणि अरण्येश्वर येथील कारखान्यात बनवलेली ही उपकरणे आज भारत आणि भारताबाहेरही कित्येक देशात सुमारे १०००० हून ही जास्त शल्यविशारद वापरत आहेत. या उत्पादनांचे जागतिक दर्जाचे प्रमाण म्हणजे या उत्पादनांना मिळालेली विविध पारितोषिके, व्यवसायाचे ISO ९००१, ISO १३४८५ आणि CE Mark चे मानांकन आणि Neuro, Ortho आणि Cardiac या तिन्ही क्षेत्रातील तज्ज्ञांकडून मिळालेली पसंतीची मोहर.. तीही गेली चाळीस वर्षे! आणि या निमित्ताने आपण भारत व भारताबाहेरही आपला ठसा उमटवला.

आज वयाच्या ७८ व्या वर्षीही कार्यरत असलेलं एक अत्यंत सहृदय, अजातशत्रू व्यक्तिमत्व! कारखान्यातल्या प्रत्येक व्यक्तीला आपले कुटुंबीय मानणारं! त्यांच्या सुख दुखाःत सहभागी होणारं! आर्थिकदृष्ट्या मागासलेल्यांना मदत करणारं! समाजात आदर्शवत असे!

व्यवसाय करताना सचोटी व प्रामाणिकपणा, सामाजिक भान आपण ठेवलेत. तसेच थर्मल पॉवर स्टेशनसाठी डिझाइन केलेली पाईपलाईन, टेल्को, पिंपरी, पुणे येथे प्रशिक्षण अधिकारी म्हणून आणि ३९ वर्षांपासून शस्त्रक्रिया साधने व उपकरणे विकसित करण्यात आपण भरीव योगदान दिले. सर्जनशीलता आणि स्वतः मुलांसाठी नवीन उपक्रम राबविले पाहिजेत तसेच आर्थिक व वेळेचे नियोजन, कामाला कृतीशीलतेची जोड, आकाशात भरारी घेण्याचे स्वप्न, प्रत्येक समस्येचा बहुअंगाने विचार, दूरदृष्टीकोन, प्रयत्न, सातत्य, जिद्द, आत्मविश्वास व प्रामाणिकपणा अशा बहुअयामी व्यक्तिमत्वाचे आपण, व्यवसायातील अनेक बारीकसारीक गोष्टींचा विचार करत कामावर मनापासून प्रेम केले, माणसे जोडणे ही आपली आवड व हातोटी आहे. प्रचंड मित्रपरिवार असूनही सामाजिक जबाबदारीचे भान आपण कायमच राखता. शून्यातून विश्व निर्माण केलेत. वक्तशीरपणा, कामाची अभूतपूर्व धडाडी, १६ ते १८ तास काम करण्याची तडफ, प्रत्येक क्षणाचा योग्य उपयोग करण्याचा आपला अट्टाहास आहे. 'पोट्रेट रेखांकन' आणि 'CADD CAM' शिकण्यासाठी भारताला गुणवत्तेचे प्रतिक बनवायची आपली महत्वाकांक्षा.

शब्द, वेळ, तत्परता, कौशल्य, ज्ञान, सातत्य व सर्जनशीलता आपण व्यवसायातही पाळली आणि म्हणूनच आपण कुस्त्रो वाडिया महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी असल्याचा आम्हांस सार्थ अभिमान आहे.

आपले शांत, संयमी माणसे जोडणारे, सर्वांचा विचार करणारे, समानतेची वागणूक देणारे, स्वकष्ट, सकारात्मक विचारांची ऊर्जा, समाधानी, आनंदी, उत्साही, आमच्या पिढीला मार्गदर्शक, दिशादर्शक ठरणारे आहेत. यासाठीच आपणांस ''CWITIAN'' चा ''DIAMOND OF CWITIAN 2018'' पुरस्कार आम्ही आपणांस कृतज्ञतापूर्वक सन्मानाने देत आहोत, याचा आपण स्वीकार करावा, ही विनंती.

**❋ आपले विनीत ❋**

**श्री. ज्ञानेश्वर मोळक**
अध्यक्ष

**श्री. एम. आर. अंतुरकर**
उपाध्यक्ष

**श्री. एस.एस. रासने**
उपाध्यक्ष

**श्री. ए. एस.शेलार**
सेक्रेटरी

**श्री. ए. वाय. देवरे**
खजिनदार

**श्री. व्ही. आर. राव**
प्राचार्य, कुस्त्रो वाडिया इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नोलॉजी, पुणे

**सर्व कार्यकारिणी सदस्य व माजी विद्यार्थी** CWITIAN

